जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४५९ दिनांक - २३/०६/२०२३**

चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## गुंगीचे औषध देवुन अत्याचार करून,तिचेकडुन खंडणी मागणा-या गुन्हेगारास केले जेरंबद

यातील नमुद आरोपी नामे-**विरेश यशवंत म्हस्के,वय-४० वर्षे,रा.४८/२,लेन नं.९, गणेशनगर,वडगाव-शेरी,पुणे** याने फेब्रुवारी २०१९ मध्ये फिर्यादी महिला हिस नाष्टया मध्ये गुंगीचे औषध देवुन तीचेवर अत्याचार करून,सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीस मुलगी झाल्यानंतर तिला वडीलांचे नाव देण्यासाठी २०,००,०००/- रूपयांची खंडणी स्वरूपात मागुन,१२,००,०००/- रूपये लोन फिर्यादीचे नावावर घेवुन ते आरोपीने फिर्यादी महिलेस धमकी देवुन,स्वतःचे खात्यावर ट्रान्सफर करून घेवुन तो फरार झाला होता. सदरबाबत महिलेने तक्रार दिलेवरून दि.२०/०६/२०२३ रोजी **चंदननगर पोलीस स्टेशन येथे भादवि कलम ३७६,३७६(२)(एन),३८४,३२३,३२८,५०४,५०६** अन्वये गुन्हा नोंद झाला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने चंदननगर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे आरोपीचा शोध घेत असताना,तपास पथकातील **पोलीस अंमलदार,शिवाजी धांडे व नामदेव गडदरे** यांना तांत्रिक विश्लेषणद्वारे तसेच गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सदरचा आरोपीत इसम हा खांदवे नगर भागात लपुन बसला आहे. त्यानुसार सदर आरोपीचा स्टाफसह शोध घेवुन,त्यास खांदवेनगर,पुणे भागातुन दि.२०/०६/२०२३ रोजी ताब्यात घेवुन तात्काळ अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही श्री.शशिकांत बोराटे,पोलीस उपआयुक्त,परीमंडळ-०४,पुणे शहर, श्री.संजय पाटील,सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे राजेंद्र लांडगे,वरीष्ठ पोलीस निरीक्षक,चंदननगर पो. स्टे. पुणे शहर, जगन्नाथ जानकर, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),चंदननगर पो. स्टे. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी.अरविंद कुमरे, पोउपनिरी.दिलीप पालवे, पोलीस अंमलदार,सुहास निगडे, सचिन रणदिवे, अविनाश संकपाळ, श्रीकांत शेंडे, शिवाजी धांडे, महेश नाणेकर, नामदेव गडदरे, श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव, शेखर शिंदे, सुभाष आव्हाड, विकास कदम, गणेश हांडगर यांनी केली असुन,पुढील तपास मपोउनि.सांगिता काळे हया करीत आहेत.